# सकाम कर्म, निष्काम कर्म, कर्मफलत्याग आणि अकर्म कर्म

## विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 मुखपृष्ठ संकल्पना ७

卐 मनोगत ८


## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. कर्म आणि कर्माचे परिणाम ९

२. कर्मफळ ११

३. सकाम कर्म ३२

४. निष्काम कर्म, कर्मफलत्याग आणि अकर्म कर्म या संज्ञांविषयी ३३

५. निष्काम कर्म ३४

६. कर्मफलत्याग ४३

७. अकर्म कर्म (ज्ञानोत्तर कर्म) ४४

८. कर्मयोगातील टप्पे ५६

卐 ‘निष्काम कर्मा’विषयीचे सखोल ज्ञान ५८

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ५९


---

**टीपा** १. ग्रंथात अन्य संदर्भग्रंथ, तसेच लिखाण यांतून काही सूत्रे घेतली आहेत. अशा सूत्रांच्या अंती लहान अक्षरांत कंसात संदर्भक्रमांक घातले आहेत. त्याचे विवरण ग्रंथाच्या शेवटी ‘संदर्भसूची’मध्ये दिले आहे.

३. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

४. ग्रंथात बर्‍याच ठिकाणी ‘प.पू. डॉक्टर’ किंवा ‘प.पू. डॉ. आठवले’ असा उल्लेख आला आहे, तो ग्रंथाच्या संकलकांपैकी ‘परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले’ यांच्याविषयी आहे.

## मनोगत

कुडीत प्राण असेपर्यंत मनुष्याकडून कर्म होतच रहाते; किंबहुना ते त्याला करावेच लागते. चांगल्या-वाईट कर्मांचे फळ मनुष्याला मिळतेच. कर्मयोग आचरणाऱ्या मोक्षार्थ्याला कर्म असे करावे लागते की, त्याचे फळच मिळणार नाही; कारण असे कर्म कर्मबंधनात न अडकवणारे असते. असे कर्म टप्प्याटप्प्याने कसे करता येते, याचे दिशादर्शन या ग्रंथात केले आहे.

कर्माचा पहिला टप्पा म्हणजे 'सकाम कर्म'. व्यावहारिक इच्छा, अपेक्षा, भावना इत्यादींमुळे सर्वसाधारण मनुष्याकडून सकाम कर्मेच जास्त होत असतात. उपासकाकडूनही आरंभी सकाम उपासनाच घडत असते. या कर्मामुळे पाप किंवा पुण्य मिळून मनुष्य कर्मबंधनात अडकतो. सकाम कर्म करतांना हळूहळू कर्तेपणाची भावना आणि फलाशा न्यून होत गेली की, 'निष्काम कर्म' करता येते. हा कर्माचा दुसरा टप्पा झाला. निष्काम कर्म दोन प्रकारांनी घडते - मायेतील निष्काम कर्म आणि अध्यात्मातील निष्काम कर्म. मायेतील निष्काम कर्मामुळे, उदा. गरजूला दान दिल्यामुळे पुण्य लागते. याउलट अध्यात्मातील निष्काम कर्म मोक्षसाधनेसाठी केले जात असल्याने त्याद्वारे आध्यात्मिक उन्नती होऊन पापपुण्याच्या पलीकडे जाता येते. मनुष्याला मायेतील कर्मे तर सारखी करावीच लागतात. त्यामुळे पापपुण्याच्या पलीकडे जाण्याचा उपाय म्हणजे 'कर्मफलत्याग' करणे, म्हणजे कर्माचे फळ ईश्वरचरणी अर्पण करणे. हा कर्माचा तिसरा टप्पा झाला. जर कर्मच असे केले की, ते कर्म म्हणून गणले गेले नाही, तर त्या कर्माचे फळ मिळण्याचा आणि त्या फळाचा त्याग करण्याचा प्रश्नच येत नाही. असे कर्म करूनही न केल्यासारखे असते. यालाच 'अकर्म कर्म' असे म्हणतात. हा कर्माचा चौथा टप्पा होय. नामजप अखंड करणारा मनुष्य सकाम कर्मातून एकदम अकर्म कर्मातही जाऊ शकतो.

या ग्रंथात दिलेले कर्माचे टप्पे समजून घेऊन त्याप्रमाणे ते आचरणात आणणारा लवकर कर्मबंधनातून मुक्त होवो, म्हणजेच त्याला मोक्षप्राप्ती होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. - **संकलक**